P.V.G.'s
# Muktangan English School & Jr. College,
44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.
## Preliminary Examination (2025-26)
## Standard - XII

Subject : Marathi | Marks : 100

Date : 09 | 1 | 2026 | Time : 8.15 am to 11.15 am

**(विभाग १ गद्य)** **(२०)**

**कृती १ खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (८)

निसर्गात तर काय आनंद भरून राहिलेला आहे. 'देता किती घेशील दो कराने', अशीच अवघी परिस्थिती आहे. हिवाळ्यातल्या कोवळ्या उन्हाचा आनंद, श्रावणातली रिमझिम अंगावर झेलण्यातला आनंद, चांदण्या रात्री भटकण्यातला आनंद.. झाडांचे नुसते आकार पाहत हिंडलं, तरी थक्क व्हायला होतं. हिरव्या रंगाच्या नुसत्या छटा पाहत राहिलं तरी भान हरपतं. बदलत्या प्रकाशात त्या बदलताना न्याहाळत बसलं, तर वेडं व्हायला होतं. साक्षात निसर्ग ज्यांना आनंद देऊ शकत नाही, त्यांनी आयुष्यातील आनंदाला विसर्ग द्यावा, हेच बरं.

संगीताच्या सात सुरांमध्ये तर सात जन्म पुरेल एवढा आनंद भरून राहिलेला आहे. आपलं शास्त्रीयसंगीत ही तर आनंदाची इस्टेटच आहे. कुमारगंधर्व, पं. भीमसेनजी, पं. जसराज, किशोरी आमोणकर यांचं गाणं आपण ऐकू शकतो, हे केवळ भाग्यच म्हणायला हवं. आत्मिक आनंद म्हणतात, तो यापेक्षा फारसा वेगळा नसावाच. आत्म्याच्या या भाषेत गाता आलं नाही, तरी ऐकता येतंच ना? कलाकार मंडळी खरी जगतात ती कलेच्या मस्तीतच. एखाद्या कलेशी आपणही दोस्ती करू शकलो, तर एका वेगळ्याच विश्वात वावरता येतं, निर्मितीच्या आनंदाशी नातं जोडता येतं. या आनंदाची जात काही वेगळीच असते; पण कलावंत होता आलं नाही, तरी रसिक होण्याचा आपला अधिकार कुणीच नाकारू शकत नाही. कलेच्या आस्वादातला अनोखा आनंद हा आपणच आपल्याला बहाल करू शकतो. निर्मिती म्हणजे काही प्रत्येकानं ताजमहाल बांधायला हवा असं थोडंच आहे? पोरांच्या बरोबरीनं दिवाळीतला किल्ला करण्यातही मौज असतेच.

शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो. शिकलेलं शिकवण्यातही आनंद असतोच. हा आनंद आपण किती घेतो? नाइलाजानं नव्हे, परीक्षा देण्यासाठी नव्हे की कुणावर उपकार म्हणून नव्हे, केवळ स्वत:ची हौस म्हणून काही शिकून पाहा. एखादी कला, एखादी भाषा, एखादा खेळ. माणसं स्वत:ची हौस, स्वत:चा छंद विसरू कसा शकतात, हे मला न उलगडलेलं कोडं आहे. खेळाचा आणि छंदाचा उद्देशच केवळ आनंद हा असतो. पोटापाण्यासाठी उद्योग आणि आनंदासाठी छंद इतकं हे साधं गणित आहे आणि छंद म्हणाल तर तो अगदी कुठलाही असू शकतो. वेगवेगळे दगड गोळा करण्याचं किंवा पक्षी निरीक्षणाचं.. कसलं कसलं वेड घेतात लोक डोक्यात;

पण तेच त्यांच्या आनंदाचं आणि उत्साहाचं रहस्य असतं. आनंद हवा असेल, तर थोडं वेडं व्हावंच लागतं. नेहमी 'शहाणंसुरतं' राहून जमत नाही.

शहाणंसुरतं राहायचं असेल, तर वाचनाचा छंद लागतोच. पुस्तकांची सोबत म्हणजे तर अक्षरआनंदाची सोबत. ही सोबत तुम्हांला कधीच दगा देत नाही. या आनंदासाठी टिच्चून पैसे मोजावे लागत नाहीत. तुमचा हा आनंद कुणीच हिरावून घेऊ शकत नाही. सपाटून वाचावं आणि झपाटून जावं. माणसं अस्वस्थ होतात, उदास होतात, तेव्हा परमेश्वराचा धावा करतात. काहीजण अशा वेळी आवडीचं पुस्तक वाचतात, त्यादृष्टीनं पुस्तकाला परमेश्वरच म्हणायला हवं. अशा वेळी मित्रही हवे असतात.पण ते काही नेहमी उपलब्ध नसतात. पुस्तकं म्हणजे कायम उपलब्ध असलेले मित्र असतात.

१) निसर्गात भरून राहिलेल्या आनंदाचे वर्णन करा. (२)

२) उताऱ्यात आलेल्या वेगवेगळ्या गायकांची नावे लिहा. (२)

३) वरील उताऱ्याच्या आधारे आनंदाचे वर्णन करा. (४)

**कृती १ आ) खालील उताऱ्याच्या आधारे कृती करा. (८)**

मनुष्यस्वभावाप्रमाणे मीही प्रथम दातांची पर्वा केली नाही. दात दुखणाऱ्या माणसांची अवहेलना केली. एवढ्याशा दातदुखीचे एवढे मोठे कौतुक लोक का करतात हे मला कळत नसे. आमच्या परशा पहेलवानासारखा मस्त गडीसुद्धा दातांपुढे चारीमुंड्या चीत झालेला मी पाहिला, तेव्हा मला दातदुखीचा जरा संशय आला.

परशा हा जन्मापासून पहेलवान. रानात अनेकदा लांडग्याशी एकटा झुंजलेला. अनेक लांडग्यांचे सुळे नुसत्या काठीच्या तडाख्याने पाडणारा हा गडी नेहमी अशा ऐटीत चालायचा, की जसा काय वनराजच! छाती इतकी पुढे काढायचा, की अनेकदा आधी त्याची छातीच दिसायची आणि अर्ध्या मिनिटाने त्याचा चेहरा दिसायचा. रस्त्यात भेटला, की ''काय रं, कुटं निगालास?'' असा त्याच्या दृष्टीने अत्यंत प्रेमळ; पण माझ्या दृष्टीने अतिशय उर्मट असा सवाल करायचा. मला त्याचा राग येत असे.

''चाललोय कुस्ती मारायला... येतोस?''

''कुस्ती?'' असे म्हणत तो अत्यंत विकट हास्य करायचा आणि ''अरं, अगुदर माशी तर मार नाकावरली... मग कुस्तीचं बगू'' असे म्हणून माझ्या खांद्यावर मोठ्या प्रेमाने दणका द्यायचा; पण गंमत अशी, की दणका मला दिला तरी लागायचे त्याला.

''लइ हाडं हैत तुझ्या अंगात! दगडावाणी लागत्यात हाताला.'' असे त्याने म्हटले, की हाडाच्या बाबतीत का होईना; पण आपण त्याच्या वरचढ आहोत याचाच आनंद अधिक वाटायचा.

आपल्या ताकदीची-मस्तीची परशाला फार घमेंड होती. स्वत:चा उल्लेख करताना तो 'शिंव्ह' म्हणायचा. स्वत:ला 'शिंव्ह' म्हणून घेण्यात त्याला अभिमान वाटायचा.

१) उत्तरे लिहा.

अ) लेखकाला दातदुखीचा संशय येण्यामागचे कारण लिहा. (१)

ब) लेखकाच्या दृष्टीने परशा विचारत असलेला उर्मट सवाल लिहा. (१)

२) परशा पहिलवानाची दोन वैशिष्ट्ये लिहा. (२)

३) परशाचे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दांत लिहा. (४)

कृती १(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (४)

पाण्याच्या पृष्ठभागावर शेती करायची म्हटली तर क्षेत्रही फारच थोडे लागते; भूमीपेक्षा एक चतुर्थांश क्षेत्रात हायड्रोपोनिक्स पद्धतीने आठपट अधिक उत्पन्न येते व खर्च आणि श्रमही अत्यल्प लागतात. या पद्धतीने शेती करण्यापासून अनेक लाभ आहेत. ज्या भागातील शेती नापीक, ओसाड आहे त्या भागात ही अभिनव शेती केवढी उपयुक्त आहे! थोड्या परिश्रमात व थोड्या खर्चात उत्पन्न कसे प्रचंड मिळते हे त्याची नमुना आकडेवारीच सांगते. जसे–जमिनीवरील एक एकर शेतीत १३ क्विंटल तांदूळ पिकतो तर पाण्याच्या पृष्ठभागावरील एक एकरात १४३ क्विंटल तांदूळ पिकतो!

भारतात कलकत्ता (कोलकाता) मुंबई, लखनौ व दक्षिण भारतात काही केंद्रांत हायड्रोपोनिक्सचे प्रयोग सुरू आहेत. लखनौच्या राष्ट्रीय उद्यानात हायड्रोपोनिक्सचा एक स्वतंत्र विभागच आहे.

पाण्याच्या पृष्ठभागावरील शेतीचे हे विलक्षण संशोधन कृषी क्षेत्रात महत्त्वाची क्रांती घडवून आणील यात शंकाच नाही.

१) हायड्रोपोनिक्स पद्धतीचे फायदे लिहा. (२)

२) भारतातील ज्या केंद्रात हायड्रोपोनिक्स पद्धतीचे प्रयोग चालू आहेत त्यांची नावे लिहा. (२)

## (विभाग २ पद्य) (१६)

**कृती २ अ खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)**

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ.।।

पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।

मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ।।२।।

ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मार्गे सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३।।

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

१) तम घाम अंगासी आला म्हणजे----- (१)

२) मनुष्य इंगळी अति दारुण, म्हणजे---- (१)

३) काम क्रोध रूपी विंचू-इंगळी उतरवण्याचे उपाय---- (२)

४) पंचप्राण व्याकूळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।

वरील ओळींचे रसग्रहण करा. (४)

**आ)खालील ओळींचा अर्थ लिहा.** **(४)**

सहज आरशात पाहिले आणि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना गती ।'
माझे रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य....!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं...! तू कशी होतीस ते!

**इ) खालील कृती सोडवा. (रसग्रहण करा.)** **(४)**

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळी; पिंजारलेली दाढी आणि झिंज्या
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील
मुलाकडे, ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
त्याची त्याला कल्पनाच नाही.

## (विभाग ३ साहित्यप्रकार : कथा) (१०)

**कृती ३ अ) सूचनेच्या आधारे कृती करा.** **(४)**

१) कथाबीज : कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच 'कथाबीज' असे म्हणतात.

२) कथानक : कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

३) पात्रचित्रण : पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व' निर्मिती असते.

४) वातावरण निर्मिती : कथेला स्थळ-काळाबरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींना युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सधन तितकी कथा सकस होते.

५) नाट्यमयता / संघर्ष : कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्ष किंवा नाट्य हे वाट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कषबिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

१) कथाबीज म्हणजे काय ते लिहा. **(२)**

२) कथाकाराच्या 'पात्र' या शब्दरूप प्रतिमेची दोन वैशिष्ट्ये लिहा. **(२)**

**आ) खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

१) 'शोध' या कथेद्वारे अनुचे शब्दचित्र रेखाटा.

२) गावातल्या उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत लिहा.

३) 'शोध' या शीर्षकाची समर्पकता पटवून द्या.

४) 'गढी' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

## (विभाग ४ उपयोजित मराठी) **(१८)**

**कृती ४ अ) खालील पैकी कोणत्याही चार कृती सोडवा.** **(८)**

१) माहितीपत्रक म्हणजे काय ते लिहा.

२) मुलाखतीचे प्रमुख हेतू स्पष्ट करा.

३) अहवालाची प्रमुख चार अंगे कोणती ते लिहून कोणत्याही एका अंगाची माहिती लिहा.

४) अहवालाचे स्वरूप लिहा.

५) वृत्त लेखाचे कोणतेही दोन प्रकार लिहून त्याची विस्तृत माहिती लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

१) खालील मुद्द्याच्या आधारे मुलाखत घेत असताना कोणती काळजी घेतली पाहिजे ते स्पष्ट करा.

मुद्दे – प्रश्नांची रचना ----- त्यामुळे निर्माण होणारे वातावरण ---- प्रश्न विचारण्यासंबंधीची पूर्वतयारी ---- मुलाखत घेणाऱ्याचे हावभाव --- वेळेचे बंधन आवश्यक

२) खालील मुद्द्यांच्या आधारे अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये लिहा.

मुद्दे – वस्तुनिष्ठता व सुस्पष्टता ---- विश्वसनीयता ---- भाषेचा सोपेपणा ---- शब्दमर्यादा ---- नि:पक्षपातीपणा

३) खालील मुद्द्यांच्या आधारे वृत्तलेखनाच्या विषयाच्या स्रोताची माहिती लिहा.

मुद्दे – बातमी ---- व्यक्तिगत अनुभव --- भेटीगाठी ---- सूक्ष्म निरीक्षण ---- निरीक्षणातून समोर आणले जाणारे घटक ----

४) खालील मुद्द्यांच्या आधारे माहितीपत्रकाचे स्वरूप लिहा.

मुद्दे – माहितीपत्रक म्हणजे ---- जनमत आकर्षित करणारे माध्यम ---- ग्राहकांना होणारे फायदे ---- माहितीपत्रकाचे वेगळेपण.

## (विभाग ५ व्याकरण व लेखन) **(३६)**

**कृती ५ अ) सूचनेनुसार कृती करा.** **(२६)**

१) हा आनंद सर्वत्र असतो. (१)
या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्य सोडवा.

अ) हा आनंद कुठे नसतो?
ब) हा आनंद असतो कुठे?
क) हा आनंद सर्वत्र असतो का?
ड) हा आनंद सर्वत्र नसतो का?

**२) सूचनेप्रमाणे सोडवा.** **(२)**

१) किती गडगडाट झाला ढगांचा काल रात्री! (विधानार्थी करा.)
२) हजार रुपये ही खूप मोठी रक्कम आहे. (नकारार्थी करा.)

**३) समास लिहा.** **(४)**

१) नीलकंठ २) त्रिभुवन ३) भाजीपाला ४) राजाज्ञा

**४) प्रयोग ओळखून लिहा.** **(२)**

१) 'दलालांनी मार्गदर्शन संपवून चहा मागवला'
i) भावे प्रयोग
ii) कर्मणी प्रयोग
iii) कर्तरी प्रयोग

**५) कर्तरी प्रयोगाचे वाक्य शोधून लिहा.** **(१)**

१) श्वेता गाणे म्हणते.
२) चालकाने वेगाला आवरावे.
३) समीरने बक्षीस मिळवले.

**६) अलंकार ओळखा.** **(२)**

१) आहे ताजमहाल जगती तो एक त्याच्या परी.
२) न हे नयन की पाकळ्या उमलल्या सरोजातील.

**७) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **(४)**

१) चारी मुंड्या चीत होणे –
२) शंख करणे –
३) डोळा लागणे –
४) आश्चर्य वाटणे –

**८) पुढील वाक्यात विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.** **(२)**

१) जे काम करायचं आहे त्यात आनंद घ्यायला शिकणं हेही शक्य असत.
२) तो उदगारला सिर्फ दिमाग में डाल देना है

**९) पुढील पारिभाषिक शब्दांना मराठी प्रतिशब्द लिहा.** **(२)**

१) Zero hour – २) Zoology - ३) Honorary - ४) Millennium -

**१०)** खालील शब्दांतील अचूक शब्द लिहा. **(२)**

१) अ) उच्चार ब) उच्च्यार क) उच्यार
२) अ) आकर्ण्य ब) आकरण्य क) अकर्ण्य
३) अ) ध्वनी ब) ध्वनि क) ध्वानि
४) अ) उल्लासित ब) उलसित क) उल्हसित

**११)** वाक्य शुद्ध करून लिहा. **(२)**

१) सरवं गोष्टींबद्दल माजा मनात वीक्राल भिती होति.
२) एखादि मरदुमकी गाजवुन आलेलया योदध्यांप्रमाणे युनिट मधिल आठदहा जणांनी आमच जोरकस स्वगत केल.

**१२)** शब्दांचे अर्थ लिहा. **(२)**

१) त्वरा – २) असूया – ३) कवन – ४) दिठि –

**१०)** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा. **(१०)**

१) माझी अविस्मरणीय सहल २) माझी आजी ३) मी रस्ता बोलतोय
४) मोबाईल शाप की वरदान ५) मी वारा झालो/झाले तर....

❖❖❖